**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ सदरूद्दीन बशर खान यांचा पुढील सरतपास अर्जदारातर्फे वकील श्री. हर्षल पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>**

सदर प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला असुन तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली आहे.

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१ याचा उलटतपास सामनेवाला क्र.१ तर्फे सरकारी वकिल श्री. वाय. एस. भोपी यांचे मार्फतः-</u>**

२. जमीन संपादन झाल्यानंतर मोबदला घेण्यासाठी मी गेलो होतो. नुकसानभरपाईची रक्कम घेतेवेळी मी रक्कम मंजूर नसल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीत आम्ही भाजी व झाडे लावत होतो. हे म्हणणे खरे नाही की, जमीन ओसाड होती. जमिनीत पाणी व विज असल्याबाबत पाणी व विज बिल गव्हर्नमेंट सर्व्हेअर यांना मी दिले होते की नाही हे मला माहीत नाही. संपादित जमीन शेतजमीन होती. मी इन्कम टॅक्स भरतो. सन १९९५ मध्ये मी इन्कम टॅक्स भरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस मिळाल्यानंतर मी रेफरन्स फाईल केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझी आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने आम्ही कलम १२ ची नोटीस मिळाल्यानंतर रेफरन्स दाखल केले नसल्याचे मी खोटे कारण दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरहु प्रकरण मुदतीच्या बाहेर आहे. हे म्हणणे खरे नाही की, बाजारमुल्यानुसार दिलेली नुकसानभरपाईची रक्कम योग्य होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अवाजवी व अवास्तव रकमेची मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास सामनेवाला क्र.२ तर्फे</u>**

**<u>सामनेवाला क्र.२ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

समक्ष

सही/-

पनवेल
दिनांक : ०६/०१/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.